| MHLA160006262024 | **<u>नियमित फौजदारी खटला क्र.९०/२०२४</u>**<br>**<u>शासन वि. सुधीर व ईतर</u>** |
|---|---|

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. अर्ज निशाणी ८४ वरील आदेश दिनांक १८/०७/२०२५ प्रमाणे अभियोग पक्षाला रुजू होण्याचा आदेश, प्रशिक्षण आदेश व रुजू होण्याचे पत्र याबाबत दुय्यम पुरावा नोंदविण्याची परवानगी दिलेली आहे. आरोपी क्र.१ चे अधिवक्ता श्री. नागराळे आणि आरोपी क्र.२ चे अधिवक्ता श्री. सी.एस. मेटे यांनी सदर आदेशाला आव्हानीत करायचे आहे या आधारावर अर्ज निशाणी ८५ प्रमाणे वेळ मागितला होता. त्याप्रमाणे तो मंजूर झाला होता. आजरोजी अधिवक्ता श्री. नागराळे यांनी नमूद आदेशाविरुध्द रिव्हीजन किंवा अपील सादर केलेले नाही व करणार सुध्दा नाही असे सांगितले. आरोपी क्र.२ स्वत: हजर आहे परंतु त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. आरोपी क्र.२ ने सदर आदेशाविरुध्द अपील किंवा रिव्हीजन केलेले नाही असे सांगितले. आरोपी क्र.१ हा न्यायालयीन बंदी असल्याने प्रकरण जलद गतीने चालविणे आवश्यक आहे. सबब आरोपींनी अर्ज निशाणी ८४ वरील आदेश आजपर्यंत आव्हानीत केलेला नाही किंवा सदर आदेशास स्थगन आदेश नाही आणि आरोपी क्र.२ ने सदर आदेश आव्हानीत करण्यासाठी तहकुबीचा अर्ज सुध्दा दिलेला नाही. त्यामुळे त्याबाबत प्रतीक्षा करणे अनुचित ठरेल. सबब साक्षीदार क्र.३ विष्णु याला पुढील साक्षीकरिता बोलावणे उचित ठरेल. त्याप्रमाणे त्यास साक्षीसमन्स काढावा.

०२. आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.07.29 17:13:06 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – २९–०७–२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**